# <u>खंडणी</u>

उमगले मला ज्या क्षणी
देवा तूच सुखाची खणी
शरण मी आलो चरणी
अर्पिली भक्तीची खंडणी

सार्वभौम तू या विश्वाचा
कर्ता करविता साऱ्यांचा
आधार दीन दुबळयांचा
तूच कलिकाल दुष्टांचा

कुणा कळे तुझे रहस्य
दिसे कधी नित्य अदृश्य
देसी भक्तांना शांती सौख्य
घेऊनी शुल्क परी शून्य

– नारायण
०९/०५/२३